नि.दि.दा.क्र.३७/२०२०
नि.क्र.८४

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.२ ते ४ करीता विधीज्ञ श्री.जे.पी. पांडे यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -**

२०. माझे शिक्षण इयत्ता १० वी पर्यंत झालेले आहे. दाव्यातील मजकुराबाबत मला माहिती आहे. दावा मिळकत ही गट क्र.७४ व गट क्र.७५ ला लागून आहे. गट क्र.७४ व गट क्र.७५ या जमिनीची आम्ही मोजणी करुन घेतलेली नाही. जि.प. ने कोणत्या गटाकरीता ठराव क्र.३७५ पारीत केले, याबाबत मला माहिती नाही. प्रतिवादी क्र.३ अथवा ५ यांनी गट क्र.७४ ला लागून बीओटी तत्वावर आम्हांला गाळे बांधून देणार याबाबत काही ठराव केल्याचे मला माहित नाही. दावा मिळकतीच्या मागील बाजूस म्हणजेच पुर्वेला राधोजी राठोड यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत म्हणजेच १० टप-या या गट क्र.७४ व गट क्र.७५ मध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.९० वरील ठरावामध्ये गट क्र.७४ चा उल्लेख आहे. गट क्र.७५ मध्ये विहीर आहे किंवा नाही याबाबत मी सांगू शकत नाही.

२१. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१ ही गावठाणची जागा आहे. नि.क्र.९१ वरील पत्रावरुन शासनाने पुढे काय कार्यवाही केली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा दाखल करण्यापूर्वी आम्ही प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी जागेवर अतिक्रमण करुन आम्ही दावा मिळकत म्हणजेच १० टप-यांचे बांधकाम केले. अतिक्रमण काढण्याबाबत आम्हांला शासनाच्या कोणत्याही विभागाने नोटीस पाठविलेल्या नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरकारी जागेवर अतिक्रमण करुन केलेले बांधकाम काढण्यात येवू नये म्हणून आम्ही सर्वांनी मिळून कारण नसतांना हा खोटा दावा दाखल केला व मी पुराव्याचे खोटे प्रतिज्ञापत्र दाखल केले.

**<u>प्रतिवादी क्र.५ यांनी प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी घेतलेला उलटतपास अंगीकृत केला.</u>**

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2025.09.26 17:34:56 +0530

(आशिष बि. मरलेचा)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
श्रीरामपुर, जि.अहमदनगर

दिनांक २६/०९/२०२५